बीड । मंगळवार
१८.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३३९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955


# २६ अधिकाऱ्यांचे वाल्मिक कराड कनेक्शन!

## तृप्ती देसाईंनी पुरावेच दिले

## त्या पेनड्राईव्हमध्ये काय काय ?



मुंबई । प्रतिनिधी

**बीड पोलीस दलातील २६ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तक्रार सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केली होती. याप्रकरणी तृप्ती देसाई यांना पोलिसांकडून नोटीस देण्यात आली होती.** आज तृप्ती देसाई स्वतः दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पुरावे घेऊन तृप्ती देसाई बीडमध्ये दाखल झाल्या. तसेच या नोटीसच्या अनुषंगाने तृप्ती देसाई पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन पुरावेही सादर केले.

**काय म्हणाल्या तृप्ती देसाई?**

जे २६ पोलीस अधिकारी वाल्मीक कराड यांच्या संपर्कात आहेत. काही कर्मचारी दहा वर्ष एकाच पोलीस ठाण्यात आहेत. तसेच काहीजण हफ्ते गोळा करतात. याचे पुरावे पेन ड्राईव्हमध्ये आणले आहे. ज्या अधिकाऱ्यांना हे दाखवायचं आहे ते अधिकारी या ठिकाणी हजर नाहीत. त्यांना मात्र याचे गांभीर्य नाही पोलीस अधिकारी वाल्मीक कराड याच्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत, अशी टीका तृप्ती देसाईंनी केली.

तसेच अशा अधिकाऱ्यांची तातडीने बदली केली पाहिजे. अशी आमची मागणी आहे. मुख्यमंत्री गृहमंत्री पालकमंत्री यांना मागणी आहे. आता अधिवेशन चालू आहे तोपर्यंत यांना जिल्ह्यातून बाहेर काढून निलंबित करा. तरच बीड मधील गुंडाराज रोखू शकतो. जे चुकीचे पोलीस अधिकारी आहेत. त्यांना पाठीशी घालणारे अधिकाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला पाहिजे. तरच हे थांबले जाईल, त्यामुळे तातडीने यावर कारवाई केली पाहिजे.. अशी मागणीही तृप्ती देसाई यांनी केली.

धनंजय मुंडे पालकमंत्री नसले तरी राष्ट्रवादी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आरक्षणासाठी मी कायम संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या सोबत: शिवाजीराव पंडित

## मनोजदादा जरांगे यांची शिवाजीराव पंडित यांनी घेतली भेट

गेवराई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवार मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या



सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात सुसज्ज विमानतळ उभारणार

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची विधिमंडळात घोषणा

## रेल्वे पाठोपाठ विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार, याचा आनंद, बीड जिल्ह्यासह मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी : धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विमानतळ उभारून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सादर केलेला आहे. बीड जिल्ह्यात सुसज्ज असे विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या कामाला आता गती देण्यात येणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आज विधिमंडळात घोषित केले.



बीड जिल्हा प्रशासनाने मागील काळात याबाबतचा प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास संबंधित यंत्रणांकडे सादर केलेला असून, किमान तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारण्याच्या दृष्टीने सुसज्ज जागा, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून भूसंपादन इत्यादी प्रक्रिया गतीने पूर्ण करून, विमानतळ उभारणीचे काम वेगाने केले जाईल ▶▶ उर्वरित पान २ वर

# रमाई घरकुल योजनेचा निधी अडीच लाखहुन पाच लाख करावा : सचिन मुळूक

## या संदर्भात सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या माता रमाई घरकुल आवास योजनेतील लाभार्थ्यांना अडीच लाख रुपये अनुदान देण्यात येते. मात्र वाढत्या महागाईमुळे हे अनुदान अपुरे असल्याने यात वाढ करून ते पाच लाख रुपये करावे अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्याकडे केली आहे. रमाई



...राज्यात महानगरपालिका व नगरपालिका हद्दीत माता रमाई घरकुल आवास योजनेचे लाभार्थी मोठ्या प्रमाणात आहे. लाभार्थी हे गरीब कष्टकरी व रोजंदारीवर काम करणारा वर्ग आहे. योजनेचे ▶▶ उर्वरित पान २ वर

योजनेचा निधी वाढविण्यासंदर्भात सरकार सकारात्मक असल्याचे सिरसाट यांनी सांगितले असे मुळूक म्हणाले. यावेळी सोबत संभाजीनगर जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ उपस्थित होते.

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा: आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश



बीड । प्रतिनिधी

आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळीत सहा लाखाचा गुटखा पकडला



बीड । प्रतिनिधी

परळी शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सोमवारी पोलीस स्टाफ पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की एक इसम स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये गुटखा विक्रीसाठी घेऊन परळी मध्ये येणार आहे. मिळालेल्या माहितीवरून सदर वाहनाचा शोध घेता, ▶▶ उर्वरित पान २ वर

दैनिक

# मराठवाडा पत्र

वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## चतुर्थ वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

# जागतिक पहिले वृक्षसंम्मेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वनप्रकल्पाला घरघर

## दिड वर्षांपासून झाडांना पाणी मिळेना वनविभागासह जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष ; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वेशरमांची झाडे लावा लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सिने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या आणि पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन भरलेल्या सह्याद्री -देवराई वनप्रकल्पाकडे वनविभाग आणि जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष असुन वनप्रकल्पाला घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत



असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत त्यामुळे पाण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन निधीची तरतूद करण्यात यावी तसेच डोंगराला आग लागण्याच्या घटना ▶▶ उर्वरित पान २ वर



# आजच्या आधुनिक काळात समाजकार्य हे देखावा बनून राहू नये

(जागतिक सामाजिक कार्य दिन विशेष, 18 मार्च 2025)



जगातील महान समाजसुधारकांची नावे आपल्या मनात येताच, त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धेने आपण भरून जातो, कारण त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी संघर्षाचे जीवन जगले, अपार वेदना, दुःख सहन केले आणि कठीण परिस्थितीशी झुंज दिली. स्वतःची पर्वा न करता, त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत लोकांच्या हक्कांसाठी, मानवतेसाठी, समानतेसाठी, एकतेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी काम केले. त्यांना लोकांच्या समस्या आणि त्यांच्या वेदना जाणवल्या आणि त्या वेदना सुद्धा त्यांनी जगल्या. भेदभाव, जातीयवाद, लिंगभेद, वर्णव्यवस्था, अन्याय, सामाजिक विसंगती आणि कुप्रथा अशा अनेक वाईट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. आज प्रत्येक व्यक्तीला असलेले अधिकार हे त्या समाजसुधारकांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहेत. प्राण्यांपेक्षाही वाईट परिस्थितीतून जात मानव आजच्या या स्थितीत पोहोचला आहे. अनादी काळापासून, सती प्रथा, देवदासी प्रथा, अस्पृश्यता, चेटकीण शिकार, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्री जननेंद्रियाच्या विच्छेदनाची प्रथा, स्त्री भ्रूणहत्या यासारख्या भयानक प्रथा भारतात प्रचलित सामाजिक दुष्कृत्ये होती.

मुलींच्या पालकांसाठी हुंडा हा आणखी एक प्रमुख चिंतेचा विषय होता, ज्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे कारणही वाढले. महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, पितृसत्ताक व्यवस्था प्रबळ होती. खालच्या जाती आणि स्त्रियांना प्राण्यांपेक्षाही वाईट मानले जात असे. शतकानुशतके चालत आलेल्या अशा दुष्ट प्रथांचे अत्याचार आणि दडपशाही थोर समाजसुधारकांनी थांबवली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी देशात स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मचाऱ्यांना आणि महिलांना हक्क दिले आणि वंचितांना समान दर्जा दिला. पंडिता रमाबाईंनी बालविवाह थांबवण्यासाठी आणि महिला व विधवांच्या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी काम केले. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, भूदानचे प्रणेते विनोबा भावे, पेरियार ई.व्ही. रामास्वामी, कबीर, रविदास, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, फातिमा शेख, स्वर्णकुमारी देवी, सिस्टर निवेदिता, कादंबिनी गांगुली, धोंडो केशव कर्वे, मदर तेरेसा, बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ यांच्यापासून ते वर्तमानातील मेधा पाटकर, सुपर ३० चे आनंद कुमार, कैलाश सत्यार्थी, इरोम शर्मिला, सोनम वांगचुक सारखे अनेक त्यांच्या वेगवेगळ्या सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांसारख्या अनेक संतांनीही देशाच्या सामाजिक विकासात अमूल्य योगदान दिले आहे. आजही, देशातील काही अनामिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याद्वारे मानवता आणि समाजाचा विकास करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे. प्रत्येकजण स्वतःसाठी जगतो, पण जे स्वत: अगोदर दुसऱ्यांचा विचार करतात, लोकांसाठी निस्वार्थपणे जगतात आणि जे स्वतःच्या प्रसिद्धीसाठी कधीही स्वतःचे रणशिंग वाजवत नाहीत त्यांना खरे समाजसेवक म्हणतात.

दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी जगभरात जागतिक सामाजिक कार्य दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ च्या जागतिक सामाजिक कार्य दिनाची थीम शाश्वत कल्याणासाठी आंतरपिढीय एकता मजबूत करणे आहे. ही थीम पिढ्यानपिढ्या एकमेकांची काळजी घेण्याचे आणि एकमेकांचा आदर करण्याचे महत्त्व अधोरेखित करते. सामाजिक कार्य जीवनात सुसंवाद, समता आणि मानवी विकास कल्याण यावर लक्ष केंद्रित करते. माणुसकीच्या नात्याने समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये परोपकाराची भावना असली पाहिजे. थोर लोक नेहमी म्हणायचे की जर तुम्ही सामाजिक कार्य करताय किंवा निःस्वार्थपणे लोकांना मदत केली तर कोणालाही ते कळू देवू नका, ते अशा प्रकारे करा, जेणेकरून सेवा घेणाऱ्या व्यक्तीला लाज किंवा संकोच वाटू नये आणि आपल्यात देखील अहंकार निर्माण होऊ नये. चांगली कर्मे करा आणि विसरून जा, प्रत्येक धर्माने आणि महापुरुषांनी हेच शिकवले आहे, हेच आपले मूल्य असले पाहिजे. जर आपण शरीराने, मनाने, पैशाने किंवा ज्ञानाने सक्षम असू, तर आपण कोणत्याही अपेक्षा न ठेवता आपल्या क्षमतेनुसार असहाय्यांना मदत केली पाहिजे. चांगल्या कामांचे नेहमीच कौतुक केले पाहिजे, जेणेकरून इतरांनाही प्रेरणा मिळेल, परंतु दिखाऊपणा अजिबात नसावा. माउंटेनमैन दशरथ मांझी, एक अत्यंत सामान्य वृद्ध, गरीब ग्रामीण कामगार, त्यांनी २२ वर्षांच्या अथक संघर्षातून एकट्याने डोंगर तोडून लोकांसाठी मार्ग तयार करून इतिहास रचला. आर्थिक अडचणींशी झुंजत असलेले त्यांचे कुटुंब गरिबीत जगले, परंतु त्यांनी कधीही कोणाकडूनही अपेक्षा केल्या नाहीत. आजही देशात आणि जगात असे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत जे अगदी सामान्य जीवन जगतात पण त्यांचे कार्य असाधारण आहे. जरी अनेक सामाजिक कार्यकर्ते आधुनिकतेच्या ग्लॅमर आणि प्रसिद्धीपासून दूर असले तरी पण कधीकधी जेव्हा त्यांच्याबद्दल बातमी पाहायला-ऐकायला मिळते तेव्हा आपल्याला खूप अभिमान आणि समाधान वाटतो. आजच्या काळात, प्रामाणिकपणे कष्ट करून पैसे कमवून असहाय्यांना मदत करणारा माणूस शोधणे खूप कठीण आहे. आपल्या देशात निवडणुकीच्या वेळी राजकारणी कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्च करतात जेणेकरून निवडणूक जिंकल्यानंतर ते गरीब लोकांची निःस्वार्थपणे सेवा करू शकतील. ते लोकांच्या कल्याणासाठी सर्वस्व त्याग करण्याबद्दल बोलतात, नेत्यांना पक्ष बदलावे लागले तरी ते असे स्पष्टीकरण देतात की, ते फक्त लोककल्याणासाठी असे करत आहेत, त्यांना कसलाही सत्तेचा लोभ नाही आहे. आजच्या आधुनिक वातावरणाकडे पाहिले तर, प्रत्येक क्षेत्रात, सर्वत्र सामाजिक कार्यकर्त्यांचा पूर आलेला आहे. कोणतीही व्यक्ती, कधीही, आपल्या नावापुढे सामाजिक कार्यकर्ता हा शब्द जोडतो आणि विविध कार्यक्रमादरम्यान, ते रस्त्याच्या चौकात, ट्रॅफिक सिग्नलवर, गल्लोगल्ली सामाजिक कार्यकर्त्याच्या नावाने अनेक बॅनर-बोर्ड लावतात, वर्तमानपत्रांमध्ये त्यांचे संदेश प्रकाशित करतात. सध्या बॅनर-बोर्डांवर, सोशल मीडियावर अल्पवयीन मुले ही सामाजिक कार्यकर्ते म्हणून स्वतःचे फोटो लावतात. लोककल्याणासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांऐवजी आजकाल फक्त छायाचित्र काढणाऱ्या कार्यकर्तेच जास्त दिसून पडतात.

समाजात मोठ्याप्रमाणात प्रभावशाली आणि श्रीमंत लोकांची संख्या आहे जी धर्मादाय कामांपेक्षा देखाव्याच्या कार्यक्रमांच्या नावाखाली पैसे खर्च करणे पसंत करतात, जेणेकरून त्याचे नाव प्रसिद्ध होईल. समाजसेवेच्या नावाखाली स्वस्त प्रसिद्धी मिळवण्याची कल्पना लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. गरजूंना थोडेसे अन्न, धान्याचा संच, वस्तू किंवा इतर कोणतीही मदत देऊन ते फोटो काढतात किंवा रील बनवतात आणि नंतर ते सोशल मीडियावर अतिशयोक्तीपूर्णपणे सादर करतात. जरी बहुतेक स्वयंसेवी संस्था पैसे कमविण्याचे केंद्रे असली तरी, आर्थिक समस्यांशी झुंजत असतानाही काही संस्था खऱ्या अर्थाने सामाजिक सेवेच्या कार्यात गुंतलेल्या आहेत. नवजात अनाथ मुले, असहाय्य वृद्ध, अविवाहित माता, अपंग, मानसिक आजारी लोक, एचआयव्ही बाधित मुले, ड्रग्ज व्यसनी, गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्ण अशा अनेक असहाय्य गरजू लोकांना आधार देऊन, संस्था त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी देते. समाज ज्यांना स्वीकारण्यास नकार देतो, ज्यांना त्यांचे स्वतःचे कुटुंब मरण्यासाठी सोडून जातात, त्या असहाय्यांना अशा संस्था निस्वार्थपणे जवळ घेतात, यालाच सामाजिक कार्य म्हणतात.

काळानुसार, देशातील सामाजिक समस्या सतत शिगेला पोहोचत आहेत. आजही देशातील अनेक मागासलेले ग्रामीण भाग मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत, प्रत्येक क्षेत्रात गुन्हेगारी वाढत आहे. असंस्कृत गैरवर्तन, फसवणूक, भेसळ, भ्रष्टाचार, अंमली पदार्थांचे व्यसन, घराणेशाही, शिफारस, आर्थिक असमानता, स्वार्थ, लोभ आणि मत्सर सर्वत्र दिसून येतो. शहरात वृद्धाश्रमांची संख्या सतत वाढत आहे, घरगुती कलह आणि नात्यांमध्ये कटुता वाढत आहे. जर लोकांना समाजसेवेसाठी काम करण्यास बोलावले तर ते पळवाट शोधतात, पण ते प्रसिद्धी आणि फायद्यासाठी पुढे धावतात. सामाजिक कार्यकर्ते किंवा समाजसेवक हे जीवनातील एका मोठ्या त्यागाचे नाव आहे. जर आपण पर्यावरण, प्राणी, पक्षी, वन्यजीव, लोकांसाठी निस्वार्थपणे मनापासून चांगले काम केले तर आपण आपोआपच एक खरे समाजसेवक बनू. आज, आदर्शवादी सामाजिक कार्यकर्त्यांचा एक मजबूत पाया तयार करण्याची खूप गरज आहे, जेणेकरून येणारी पिढी ते आदर्श स्वीकारून योग्य मार्गदर्शकाची भूमिका चांगल्या प्रकारे बजावू शकेल. जर सर्व समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते किंवा आपणही, समाजाच्या समस्यांचे गांभीर्य समजून घेत, आपल्या क्षमतेनुसार जागरूकता आणि निःस्वार्थ सेवा करायला सुरुवात केली, तर देशातून प्रत्येक प्रकारची समस्या दूर होऊ शकते.

– डॉ. प्रितम भि. गेडाम

पान १ /४ वरून पुढे...

## २६ अधिकाऱ्यांचे...

पक्षाकडेच पालकमंत्री पद आहे. अजितदादा मात्र या ठिकाणी दिसत नाहीत. दररोज एक घटना बाहेर येत आहे मात्र त्यावर अजितदादा काहीच बोलत नाहीत. आष्टीची घटना खोक्याची घटना अनेक घटना पुढे आल्या आहेत. इथला गुंडाराज थांबवता येत नसेल तर अधिवेशनात निर्णय होणे गरजेचे आहे. जी २६ पोलीस कर्मचारी आहेत त्यात बीड घटनेतील प्रमुख आरोपींना पळून जाण्यास मदत करत होता, असा आरोपही देसाईंनी केला.

## मराठा आरक्षणासाठी...

यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात...

असेही अजित दादा पवार आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले.

बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी या घोषणेचे स्वागत केले असून, बीड जिल्हावासियांचे रेल्वे पाठोपाठ आता सुसज्ज अशा विमानतळाचेही स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. हा निर्णय म्हणजे केवळ बीड साठीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी असून, बीड जिल्ह्याच्या औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हा महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे पाठवला होता. बीड जिल्ह्याच्या रेल्वे पाठोपाठ आता विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील विमानतळ उभारण्याची मागणी केली होती. विजयसिंह पंडित यांच्यासह ही मागणी वेळोवेळी केलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींचे हे यश मानावे लागेल असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

## रमाई घरकुल...

मिळणारे अडीच लाख अनुदान हे घर बांधण्यासाठी अपुरे पडत आहे. आजघडीला महागाई वाढली असून घर बांधकामासाठी लागणारे साहित्याचे दर वाढले असल्याने अडीचा लाखांमध्ये घरकुलाचे पूर्ण बांधकाम होत नाही. या अनुदानाची रक्कम वाढवून याची मर्यादा ५ लाख केल्यास लाभार्थ्यांना लवकरात लवकर घर पूर्ण बांधकाम करण्यात मदत होऊन त्यांचे स्वप्न साकार होईल. यामुळे रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान वाढवून पाच लाख रुपये करण्यात यावे, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ व इतर मागासवर्ग महामंडळाना मिळणारे अनुदान वाढवून या महामंडळासाठी भरीव निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे. या संदर्भात मुळूक यांनी जिल्ह्याचे संपर्क मंत्री तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांची भेट घेतली. यावेळी सोबत संभाजीनगरचे जिल्हाप्रमुख राजेंद्रजी जंजाळ उपस्थित होते

## बीड येथे नवीन....

यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबींवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

## जागतिक पहिले...

वारंवार घडत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी आणि पालवण -पिंपळवाडी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मॉर्निंग वॉक साठी नागरीक तसेच योगा ग्रुपने मॅरेथॉन स्पर्धेकडे पाठ फिरवली असुन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या प्रमुख मागण्यांकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शेख मुबीन, पांडुरंग हराळे,शेख मुस्ताक ,शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

जिल्हा नियोजन समितीमधून झाडांना पाण्याची तरतूद करण्यात यावी

बीड जिल्ह्यात दिड टक्का वनक्षेत्र असुन दुष्काळाचे वारंवार संकट ओढावत आहे.जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झालेली आहे. या संकटावर मात करून वृक्ष चळवळ वाढीस लागावी म्हणून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून ४० एकरात सह्याद्री देवराई वन प्रकल्प उभारला गेला. जगातील पहिले वृक्षसंम्मेलन याच ठिकाणी झाले या प्रकल्पातील १६ एकरात करवंद,पिंपळ,लिंब,महारूक, कांचन यासह स्थानिक प्रजातीच्या ६४ हजार विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.शिवाय १२ हजार झाडांचे घनवृक्षही येथे उभारण्यात आले होते.या प्रकल्पातुन आक्सिजन झोन तयार करून वृक्ष चळवळ निर्माण करण्याचा उद्देश होता.परंतु मागील दिड वर्षांपासून देवराईतील झाडांना पाणीच नसल्याने झाडे वाळली आहेत.जळु लागली आहेत.सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडे जगवण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन २०१७ नंतर सुरूवातीला केवळ ३ वर्षच निधी मिळाला.त्यानंतर निधीचे प्रयोजन संपले. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीमधुन पाण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. दोन वर्षांपूर्वी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांच्याकडून सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडांसाठी २ दिवसाआड १२ हजार लिटर पाण्याचे मोफत टँकर दिले जात होते ते सध्या बंद आहेत.रोटरी क्लब, विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने छोटे मोठे टँकर देऊन पाणी उपलब्ध करून देण्यात येत होते सध्या तेही बंद आहे.

सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील डोंगराला वारंवार आगीची झळ ; आवश्यक उपाययोजना करण्यात यावी

३ वर्षांपूर्वी पालवण येथील सह्याद्री देवराईच्या डोंगराला १२ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारच्या वेळी अचानक लागलेल्या आगीत १८ प्रजातींची ३२३ झाडांना आगीची झळ बसुन १३ मोठ्या झाडांचे नुकसान झाले होते तर १० मार्च २०२२ रोजी गवळवाडी रोपवन आगीत भस्मसात झाले होते तर दि.२५ मार्च २०२३ रोजी लागलेल्या आगीत शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत २०१९ मध्ये पिंपळवाडी रस्त्यावर गवळवाडी येथील सर्व्हे नंबर ३७८ मधील २५ हेक्टर क्षेत्रात उभारलेल्या रोपवनाला दि.०९ मार्च २०२३ रोजी आग लागुन १० एकर क्षेत्रातील ४-५ हजार झाडे जळून खाक झाली होती. त्यामुळे आगी लागण्याच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

पालवण - पिंपळवंडी रस्त्याची दुरावस्था असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी

सह्याद्री देवराई हा हिरवळीने नटलेला परिसर असून येथे वळणदार घाट आणि शुद्ध ऑक्सिजन मिळत असल्याने बीड शहरातील नागरीक मॉर्निंग वॉक साठी मोठ्या प्रमाणामध्ये येत होते परंतु देवराईकडे जाणारा पालवण ते पिंपळवंडी पर्यंत रस्ता उघडल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांची संख्या रोडावली आहे. बीडच्या योगा ग्रुपने या ठिकाणी तीन वेळा मॅरेथॉन घेतली होती. या स्पर्धेला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला परंतु खराब रस्ता असल्याने धावपटुंनी सुद्धा देवराई सध्या पाठ फिरवल्याचे पहायला मिळते. त्यामुळे तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

## माजी आमदार तथा...

सांगितले. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचा सुरू असलेल्या व्यवसाय, बँकेची सतत वाढत असलेली वृद्धी तसेच हजारो ग्राहकांनी बँकेवर ठेवलेला विश्वास हे पाहून धिरज विलासराव देशमुख यांनी अतिशय आनंद व्यक्त करत यापूर्वी बँकेची दिवसेंदिवस अशीच भरभराट होवो अशा सदिच्छा व्यक्त केल्या. दोन्ही नेत्यांच्या या भेटीदरम्यान सध्याच्या राजकीय परिस्थितीवर देखील चर्चा झाली. गढूळ झालेले सध्याचे राजकारण व त्यास दिला जाणारा जातीय रंग याबाबत चिंता व्यक्त करत हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे देखील याप्रसंगी चर्चिले गेले.

## गुरुमाऊली...

तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे अध्यक्ष पांडुरंग चांडक, सचिव प्रभाकर शेटे तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे तालुका प्रतिनिधी शिवशंकर भंडारे, केंद्र प्रतिनिधी दिगंबर सोळंके, अमोल सोळंके, रामराजे रांजवण, लक्ष्मण चुंबळे, सदाशिव ढगे, काशिनाथ काटकर, गजु चौधरी, डॉ अशोक घुबडे, डॉ शशिल पाचपोर, लक्ष्मण सोळंके, विशाल देवकते, शरद रुचके, रामप्रसाद गोळेकर, गजानन गोळेकर, गोरख मेंडके आदींनी केले आहे..

## गेवराईच्या उपजिल्हा...

आहे. औषध टंचाईमुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.डॉक्टरांकडून रुग्णांच्या नातेवाईकांना सर्रासपणे औषधे बाहेरून खरेदी करण्यासाठी चिठ्ठी जात आहे. पण् खाजगी मेडिकल वाले याचाच फायदा घेऊन रुग्णांची लूट केली जाते ही थांबवली पाहिजे सातत्याने अपघातातील जखमी रुग्ण दाखल होतात. त्यांच्या जखमेवर ड्रेसिंग करण्यासाठी साहित्य नाही. तेही बाहेर आणायला सांगितले जात आहे.मधुमेह, रक्तदाबावरील गोळ्या नाहीत. अनेक आजारातील महागडी औषधे असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल सुरू आहेत. म्हणून खाजगी मेडिकल वाले याचा फायदा घेऊन रुग्णांना लुटवण्याचा कारभार मोठ्या प्रमाणात करत आहेत जिल्हाधिकारी महोदयांनी हि लूट थांबवावी व उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना औषधे मिळून द्यावेत अन्यथा स्टाईलने आंदोलन करू अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते शेखर भुंबे यांनी केले आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आदित्य पॉलीटेक्निकच्या ४३ विद्यार्थ्यांनी दिली नाशिकच्या 'सुमागो इन्फोटेक'ला भेट

## औद्योगिक भेट : वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर, मोबाईल, प्लिकेशन, युआय युएक्स डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंगची मिळवली माहिती

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षीकांधून मिळालेली माहिती त्यांच्या कायम स्मरणात राहते आणि ती त्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्वाची असल्याने आदित्य अभियांत्रिकीच्या ६ प्राध्यापकांनी ४३ विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट थेट नाशिकच्या सुमागो इन्फोटेक प्रा.ली. येथे दिली. तेथे विद्यार्थ्यांनी वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर, मोबाईल, प्लिकेशन, युआय युएक्स डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंगसह उद्योगातील व्यावसायिक वातावरणाचा अनुभव प्रत्यक्ष घेतला.

आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी परिपूर्ण होऊन बाहेर पडला पाहिजे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असून प्राचार्य, प्राध्यापकांना ते वेळोवेळी तशा सुचना देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य शिक्षण संस्थेत विविध उपक्रम राबवले जातात. नुकतीच आदित्य पॉलिटेक्निकच्या कंप्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सुमागो इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक या आयटी सॉफ्टवेअर कंपनीला औद्योगिक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, मोबाईल प्लिकेशन डेव्हलपमेंट, णख/णद डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंग आणि फुल स्टॅक डेव्हलपमेंट



या विषयांवर सखोल माहिती मिळाली. उद्योगातील व्यावसायिक वातावरणाचा अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञानात भर पडली. त्याच बरोबर त्यांना प्रत्यक्ष उद्योगातील कौशल्य यामधील अंतर समजले. ही माहिती त्यांना भविष्यातील नोकरी आणि उद्योजकतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांसह विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख , प्रा. अंकुर कांबळे, प्रा. सूरज शिंदे, प्रा. आकांक्षा सवासे, प्रा. पूजा जाधव, प्रा. शिवानी जाधव, प्रा.सुरज शिंदे हे प्राध्यापक सोबत होते. आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली ही औद्योगिक भेट यशस्वीरित्या पार पडली.

### आदित्य पॉलिटेक्निक आणि सुमागो इन्फोटेक यांच्यात झाला सामंजस्य करार

**विद्यार्थ्यांच्या औद्योगिक भेटीतील महत्त्वाचा क्षण म्हणजे आदित्य पॉलिटेक्निक आणि सुमागो इन्फोटेक यांच्यातील सामंजस्य करार (चेण) झाला. यामुळे विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, कार्यशाळा आणि प्रकल्पाधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहे. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.**

सुमागो इन्फोटेकच्या बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर दीप्ती पवार यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुमागो इन्फोटेकच्या बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर दीप्ती पवार आणि त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत, वेब आणि मोबाईल प्लिकेशन डेव्हलपमेंट च्या प्रक्रिया, सॉफ्टवेअर क्षेत्रातील संधी, सायबर सिक्युरिटी, तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि फुल स्टॅक डेव्हलपमेंट चे महत्व यावर सविस्तर माहिती दिली. याशिवाय, स्टार्टअप कंपन्यांमध्ये संधी, इंडस्ट्रीमध्ये आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील तंत्रज्ञान ट्रेंड्स याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कंपनीच्या वर्किंग स्ट्रक्चर ची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती समजली.

---

# संतांच्या सानिध्यात राहून चांगले विचार पेरा: ह भ प वैभव महाराज भानुशे

### तलवाडा येथील कानेश्वरी मंदीर कीर्तन महोत्सव

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे राजे छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने भगवान कानेश्वरी मंदीरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पार पडत आहे त्या प्रसंगी आजचे किर्तनकार हभप वैभव महाराज भानुशे यांचे गोड वाणी मधून कीर्तन संपन्न झाले. संतांच्या सानिध्यात राहून चांगले विचार पेरा ह भ प वैभव महाराज भानुशे यांचे प्रतिपादन तलवाडा येथील किर्तन महोत्सवामध्ये ते बोलत होते. या कीर्तनाला उपस्थित मा श्री सुरेश हात्ते साहेब सरपंच विष्णू तात्या हात्ते माजी सरपंच राधाकिसन महाराज शिंगणे शिवसेनेचे गट नेते गोविंद दादा जोशी पत्रकार आर आर आबा मा श्री काकडे साहेब मा श्री लिशे साहेब मा श्री भानुशे मा श्री मदन हात्ते सर मा श्री दिलीप काळे मा श्री बाळासाहेब कासकर मा श्री दत्ताभाऊ मोरे मा श्री कैलास मोरे मा श्री भरत राऊत ह भ प नवनाथ महाराज गिरी ह भ प रमेश नाना पिंपळे ह भ प माखले जिजा ह भ प दत्ता शिंगणे ह भ प हनुमंत महाराज घोलप हभप कदम महाराज ह भ प कासकर महाराज ह भ प जोगदंड महाराज ह भ प नाटकर महाराज ह भ प काळे महाराज ह भ प राऊत महाराज ह भ प बळीराम महाराज बहिर ह भ प बापूराव महाराज बहिर ह भ प कृष्णा हात्ते ह भ प सिद्धेश्वर महाराज शिंदे ह भ प चक्रधर महाराज शिंदे ह भ प बद्रीनाथ नाटकर ह भ प गणपत नाटकर सर ह भ प गणपत हात्ते ह भ प संतोष महाराज काळे कानेश्वरी तरुण मंडळ युवक नागरिक महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तलवाडा ग्रामपंचायतचे कर्मचारी माननीय श्री दत्ताभाऊ मोरे यांचे हभप वैभव महाराज भानुशे हे जावाई होय.

---

# सौ संजीवनी जाधव व डॉ.सौ.प्रियांका डाके ठरल्या मिसेस माजलगावच्या मानकरी

## रोटरी क्लव, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव कार्यक्रम संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धेचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ सौ प्रियांका डाके यांनी मिळवला. तृतीय क्रमांक सौ शीतल मालानी यांनी मिळवला आणि सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.



या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक अॅड रवींद्र कानडे प्रकल्प प्रमुख डॉ अर्चना पवार व सर्व रोटरियन अशोक बजाज ,लक्ष्मीनारायण मुंदडा, शशी किरण गडम, सुरेश भानप ,पंडित तिडके ,डॉ स्वानंद कुलकर्णी, जगदीश साखरे, गवारे सर, दिगंबर महाजन ,डॉ सौ अंजली अकोलकर डॉ सौ अर्चना मोरे ,सौ स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा ,सौ सोळंके मॅडम उपस्थित होते.

त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ प्राजक्ता गुंडेवार ,सेक्रेटरी सौ स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. जान्हवी वाघ आणि कु. प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले . मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले. सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

---

# माजलगावात राजे मल्हारराव होळकर यांची जयंती साजरी



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील राजे मल्हारराव होळकर चौक येथे दि.१६ मार्च रोजी सकाळी १० वाजता महापराक्रमी, विलक्षण कर्तृत्ववान, मल्हार तंत्राचे जनक व शून्यातून विशाल होळकर साम्राज्य स्थापून मराठा साम्राज्याची पताका अटकेपार फडकवत दिल्लीवर अंकुश ठेवणारे शूरवीर श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त पावन स्मृतीस अभिवादन करताना. वृंदावन धाम चे आकाश महाराज शास्त्री, शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके, भाजपा तालुकाध्यक्ष अरुणराव राऊत, धनगर समाजाचे नेते बबनराव सरवदे ,ओबीसी नेते लक्ष्मणराव गायकवाड,मा.जि.प.सदस्य
प्रा. प्रकाश गवते, अंकुशराव गांडगे, मल्हार सेनेचे अशोक डोणे, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर, युवा नेते रोहित वगरे, धनगर समाजाचे नेते अविनाश कांडुरे, युवा मल्हार सेनेचे तालुकाध्यक्ष संतोष देवकते, ओबीसी महासंघाचे तालुकाध्यक्ष शामसुंदर पांचाळ, युवा नेते नारायण मेंडके, रासपचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबुज, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी सुभाषराव गडदे मार्तंड पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते, नगरसेवक शरद यादव लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे सचिव सुरेशराव लगड, अशोकराव पाटील, भागवतराव गायकवाड ड .गणेश सजगणे, शंकर गावडे, दत्ता आबुज, शिरसट सत्यनारायण उनवणे रवींद्र खोडवे सुरेशराव सोळंके प्रल्हाद दळवी, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाणे, भगवानराव धरपडे सर, लक्ष्मण सरवदे सर, खेलबा काळे सर, गोविंद गोचडे सर, डॉ.सखाराम गायकवाड, हनुमान गावडे, तुषार जाधव, नवनाथ भेटे,अविनाश कांबळे, हरी गलांडे, सुशील गाडे, पेंटर पंकज साळवे, मनोज सोळंके सुखदेव शेळके अहिल्या राजे नेमाणे, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

---

# उद्धव म्हेत्रे नाळवंडीचे आदर्श भूमिपुत्र : अरुण नाना डाके

### बँकिंग क्षेत्रातली निवृत्ती सोहळा संपन्न

**नाळवंडी । प्रतिनिधी**

बँकिंग क्षेत्रात पूर्णवादी बँकेतील निवृत्त कर्ज अधिकारी उद्धव म्हेत्रे यांचा जन्मगावी सत्कार सोहळा पार पडला यावेळी वरील उदगार हभप अरुण नाना डाके यांनी काढले . यावेळी गावकरी व मान्यवर उपस्थित होते . नाळवंडी येथील उद्धव भानुदास मेहेत्रे हे सहकार क्षेत्रात बँकिंग क्षेत्रा मध्ये पूर्णवादी बँक मध्ये वसुली अधिकारी या पदावर काम करत होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक युवा उद्योजकांना त्यांनी आपल्या बँकिंग क्षेत्रा मधून आर्थिक निधी उपलब्ध करुन देत त्यांना उभे करण्याचे काम केले आहे. सतत इतरांना सहकार्य करत त्यांनी सामाजिक कामात ही चांगले योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत आज नाळवंडी इथे त्यांच्या भव्य असा सेवापूर्तीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रा.सदस्य बाबासाहेब काळे यांनी केले होते.

या कार्यक्रमाला अरुण नाना डाके, सुरवसे साहेब,लोक पत्रकार भागवत तावरे, मुख्याध्यापक के.डी.राऊत सर,प्रा.राजीव जी काळे सर, मा.सरपंच राधाकिसन मेहेत्रे, चेअरमन गणेश जी राऊत,भाई चंद्रसेन राऊत,कल्याण तंबरे सर, यांनी उध्दव दादा बद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

उध्दव दादा यांनी रिटायरमेंट झाली असता राजकीय भूमिकेत त्यांनी पुढे यावे त्यांचे स्वागत केले जाईल.असे ही ते जयदत्त आण्णा यांचे ते विश्वासू कार्यकर्ते आहेत.

नाळवंडीच्या राजकारणात उध्दव दादा हे सक्षम पर्याय म्हणून पुढे येतील असे मनोगत चेअरमन गणेश राऊत यांनी केले.

या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिकसह तरुण वर्ग उपस्थित होता.



---

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २५८/२०२५,**
**मिना भ्र. शिवाजी खरवडे व ईतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे शिवाजी पि. बाबुराव खरवडे हे / हया दिनांक १९/०२/२०२३ गंजी मौजे रूई, ता. गेवराई, जि. बीड, येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क. १ मीना भ्र. शिवाजी खरवडे, वय-४१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. रूई, ता. गेवराई, जि. बीड, २. सुरज पि. शिवाजी खरवडे, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. रूई, ता. गेवराई, जि. बीड. ह. मु. देवन्हावे, ता, खालापुर, जि. रायगड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाने प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर न्यायालय सदर अर्जदाराच्या सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे शिवाजी पि. बाबुराव खरवडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १५/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २१/०४/२०२५
**(मार्फत ॲड. जे. बी. देशमुख गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २११ / २०२५**
**मिना विरुद्ध निरंक (मार्फत अँड. अंकुशे एम.डी.गेवराई)**

ज्याअर्थी मयत सुभाष पि. रामलाल प्रजापत हे दिनांक ०९/०५/२०२० रोजी इंदौर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १. मिना भ्र. सुभाष प्रजापत, वय ३८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड. ह. मु. पर क. २५, गल्ली क. १२, देवी इंदीरा आदर्श नगर, इंदौर (मध्यप्रदेश) २. अदित्य पि. सुभाष प्रजापत, वय १३ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरील प्रमाणे. ३. अंजिक्य पि. सुभाष प्रजापत, वय १३ वर्षे, धंदा, शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. अर्जदार क. १ व २ अज्ञान, अ.पा. क. आई अर्जदार क. १ यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुभाष पि. रामलाल प्रजापत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०३ /२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी शिक्यानिशी दिले. पुढील तारीख ०९/०४/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २९६/ २०२५**
**बाबुआप्पा महादाप्पा शेटे व इतर वि. निरंक (मार्फत- अँड. बांगर ए.बी.)**

अर्जदार- १. बापुआप्पा पि. महादाप्पा शेटे, वय-७५ वर्षे, धंदा शेती, रा. तलवाडा ता. गेवराई जि.बीड २. दिलीप पि.बापुआप्पा शेटे, वय-५४वर्षे, धंदा -शेती, ३.गोपाल पितापुआप्पा शेटे, वय-४६ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ४.सविता भ्र. कैलास आप्पा शेटे, वय-५१वर्षे, धंदा शेती, रा. नवघन राजुरी ता. जि. बीड

प्रकरण :-भारतीय वारसा हक्क कायदा १८७२ कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत शांताबाई भ्र. बाबुआप्पा शेटे, रा. तलवाडा ता. गेवराई जि.बीड, यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत शांताबाई प्र. बाबुआप्पा शेटे, या दिनांक ०२.०५.२०२० रोजी मौजे तलवाडा ता. गेवराई जि. बीड, येथे मयत झालेले आहेत. मयत व्यक्ती या अर्जदार क ०१ ची पत्नी होती व अर्जदार क. २ ते ४ यांची आई होती. अर्जदारा शिवाय मयताचे ईतर कोणीही वारसदार नाहीत.

मयताचे नांवे खालील प्रमाणे जमा असलेली रक्कम उचलण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

अ.क.,१. तपशील महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा-तलवाडा ता. गेवराई जि.बीड, खाते नं. ५४५४२०५२५३१, रक्कम रुपये ६,६९,०३४/-, एकुण ६,६९,०३४/-

मयत शांताबाई भ्र.बाबुआप्पा शेटे, यांचे नांवे असलेल्या वर नमूद केलेली रक्कम अर्जदारांच्या नावे देण्यांत याव्यात असे अर्जदारांने म्हटले आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदार यांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

दैनिक
# मराठवाडा पत्र
epaper.marathwadapatra.com
मंगळवार, दि.१८ मार्च २०२५ पान ४

## आहील अन्सार मुजावरचा पहिला रोजा पुर्ण



**चौसाळा । प्रतिनिधी**

आहील अन्सार मुजावर या लहान चिमुकल्याने आपल्या आयुष्यातला आज पहिला रोजा पुर्ण केला. सध्या पवित्र रमजान महिन्याचे रोजे उन्हाळ्यात सुरू आहेत. शिवाय उन्हाची तीव्रता देखिल कडक आहे. अश्या अवस्थेत ९ वर्षाचा आहील अन्सार मुजावर रा.चौसाळा या चिमुकल्या बाळाने आपल्या आयुष्यातला पहिला रोजा पूर्ण केला आहे. त्याबदल त्याचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे.

### कापशी तलावाची उंची वाढवल्याने ऊस तोडणी साठी स्थलांतरीतांचे प्रमाण कमी होईल...

# 250 हेक्टर जमीन ओलिताखाली येणार : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षांत दोन आमदार मतदार संघाला मिळाले पण एकाही आमदाराला या कापशी तलावाची उंची वाढवण्याचे काम करू शकले नाहीत.. तलावाचे उंची वाढवण्याचे काम झाले असते तर या गावातील कमीत कमी ५० कोयते ऊस तोडायला गेले नसते..त्यामुळे स्थलांतरणाचे प्रमाण कमी झाले असते.आता या तलावाची उंची वाढवून २५० हेक्टर जमिन ओलीताखाली येणार असल्याने गावक-यांनी या कामांसाठी हेवेदावे बाजूला ठेऊन एकत्र येऊन सहकार्य करावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.



आष्टी तालुक्यातील कापशी येथे मृद व जलसंधारण विभाग बीड,१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचा शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी ११ वा. साठवण तलावाचे गणेश गडाचे महंत ह.भ.प.काशीनाथ महाराज व धर्मराज गडाचे महंत ह.भ.प.रोहिदास गर्जे महाराज यांच्याहस्ते भूमीपुजन करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश धस बोलत होते.यावेळी जि.प.सदस्य अमर निंबाळकर आष्टी तालुका दुध संघाचे चेअरमन संजय गाढवे,माजी सभापती छत्रगुण मरकड, एन.टी. गर्जे,नारायण वनवे,बाबु गर्जे,नवनाथ गर्जे,नवनाथ नागरगोजे, लक्ष्मण ननवरे यांच्यासह आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,मला विकासाच्या कामात टिका टिप्पणी करायची नाही पण दहा वर्षांत मतदार संघाला दोन आमदार झाले.त्यांना हा कापसीचा तलाव का दिसला नाही जर हा तलाव झाला असता तर किमान ५० कोयता तोडणारांची संख्या कमी झाली असती आता शेतक-यांनी या तलावासाठी शेतक-यांनी सहकार्य करून एका वर्षात तलावाचे काम मार्गी लावतो. हा साठवण तलाव अतिशय नॅचरल साइटवर असून या साठवण तलावामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम होणारा असून कापसी परिसरातील क्षेत्र ओलीताखाली जाणारा असल्याने मला मनस्वी आनंद होत असून अनेक दिवसाचे ही मागणी आज पूर्णत्वाकडे जात असल्याने गाव पुढा-यांनी गावातील तलावाच्या अडचणी सोडवा प्रशासकीय अडचणी मी सोडतो असा शब्दही आ.धस यांनी दिला.

ह.भ.प.काशीनाथ महाराज म्हणाले,आमदार सुरेश धस यांची मतदार संघात नाळ जुळलेली असून,त्यांनी विकासाचे राजकारण केले व करत आहेत. विकासाचं दृष्टिकोन असलेलं हे व्यक्तिमत्व आहे.

यावेळी व्हाईट चेअरमन अशोक गर्जे,सुंदरलाल गर्जे,सरपंच महाडिक, सरपंच नंदकिशोर करांडे, सरपंच विकास पवार, सरपंच अशोक इथापे, फारुख मामा, बबन तरटे, शेषराव गर्जे फौजी, पोपट गर्जे,रेवननाथ खाडे, मारुती डीसले, नितीन नाकाडे, वैभव गोल्हार, धनंजय तरटे,शिवाजी गर्जे, काकासाहेब गर्जे, आश्रुबा खलाटे, माणिक दहिफळे, अशोक तरटे, श्रीराम केदार आदीसह कापसी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेख जिहान शेख नाजेर या बाळाचा पहिला रोजा पुर्ण



**तलवाड़ा । प्रतिनिधी**

मुस्लिम समुदायातील अन्य साधारण आसे म्हत्व आसलेल्या पवित्र रमजान महिन्याचे अर्धे पर्व जवळ पास पुर्ण झाल्याच्या मार्गावर असुन सुरवातीच्या चंद्र दर्शना पासुन ते ईदच्या चंद्र दर्शना पर्यंत थोरा मोठ्यांच्या बरोबर मुस्लिम समाजातील बाल गोपाल देखील ऊन्हाची त्रीवता आसतांना रोजा(उपवास) धरून इश्वराची (आल्हाची) आराधना करण्यात अग्रेसर दिसुन येत असुन तलवाडा येथील शेख जिहान शेख नाजेर वय वर्ष ८ याने पहिला रोजा(उपवास) पुर्ण केल्याने या चिमुकल्याचे सर्वत्र कवतुक करण्यात येत असुन शेख नाजेर यांनी मुलाच्या आनंदाला ऊजाळा देत रोजा इफ्ताराच्या कार्यक्रमाचे छोटेखाणी आयोजन करुन सर्व नातेवाईक अपेष्ट मित्र परिवार यांना आमंत्रित करुन शेख जिहान या बाळाचा आनंद दिर्गुणीत केला. पहिला रोजा जिहान या बाळाने पूर्ण केल्या बद्दल सर्व उपस्थितांनी शुभेच्छा देऊन त्याचे कवतुक केले. या वेळी नातेवाईक अपेष्ट मित्र परिवाराची मोठ्या प्रमाणात उपस्थिति होती.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाने दिले ४२४८ उद्योजकांना ३२३ कोटी चे आर्थिक पाठबळ: जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर

### महामंडळाच्या माध्यमातून तरूणाची यशस्वी उद्योजक होण्याच्या दिशेने वाटचाल

**बीड । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य अभियान योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ४२४८ तरुणांना ३२३ कोटी २१लाख चे कर्जवाटप झाले आहे. तसेच या नवउद्योजकांना २८ कोटी ५२ लाख रुपयेचा व्याज परतावा त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. नियमित हप्ता भरणाऱ्यांना महामंडळाकडून व्याज परतावा दिला जातो, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर




यांनी दिली. महामंडळाकडून १०६११ तरुणांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले आहे. शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील युवकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळाच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज योजनेमार्फत उद्योग व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अर्थसहाय्यामुळे बीड जिल्हय़ात महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना स्वप्नांना साकार करण्याचे नवे बळ मिळाले आहे. नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्यांनाही नियमित व्याज परतावा येत आहे. तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा काही अडचणी असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा,असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी केले आहे.



*नांदेड : युवासेना युवाविजय महाराष्ट्र दौर्याच्या निमित्त नांदेडमध्ये विपुल पिंगळे आले असताना नांदेड येथील तख्त सचखंड श्री हजुर अबलचलनगर साहिब या प्रसिद्ध गुरुद्वारामध्ये जाऊन शीख समाजाचे 10 वे धर्मगुरु श्री गुरु गोविंद सिंहजी यांच्या समाधीचे दर्शन घेतले यावेळी माझ्या सह मराठवाडा निरीक्षक किरणजी गायकवाड,युवासेना जिल्हा अध्यक्ष अमोदजी साबळे,युवासेना जिल्हा गणेशजी शिंदे,युवासेना जिल्हा अध्यक्ष साई विभुते,युवासेना जिल्हा अध्यक्ष संदेश पाटील,युवासेना जिल्हा अध्यक्ष विकास देशमुख, युवासेना जिल्हा अध्यक्ष ओमकार धुपेकर आदी युवासैनिक उपस्थित होते.*



*ॲड. अजित देशमुख यांनी मस्साजोग येथे धनंजय देशमुख यांची भेट घेतली. नामच्या सांगण्यावरून मी नदी, नाल्यांची पाहणी केली. मस्साजोग येथे नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून जवळपास तीन नदी खोलीकरण, पाणी अडविण्यासाठी मोठे काम करण्यासाठी चर्चा केली. येत्या काही दिवसात हे काम चालू होईल. स्व. संतोष देशमुख यांना ही श्रध्दांजली ठरेल. या कामात मी स्वतः पुढाकार घेणार आहे. पाहणी दरम्यान भागवत कदम, जालिंदर देशमुख,पंजाबराव देशमुख, गणपत साहेबराव मोरे, शिरीष सज्जनराव देशमुख, महादेव किसनराव उंद्रे, तुषार संभाजीराव देशमुख, सोपानराव देशमुख, सुदर्शन देशमुख, संदीपान थोरात, डॉ. भगीरथ बांड यांच्यासह अन्य हजर होते.*



## नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

उल्हास भैय्या गिराम पाटील यांची शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल, अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने सत्कार करून पुढिल वाटचालीस शुभेच्छा देताना,, अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके पाटील वरवटी धानोरा सरपंच बालासाहेब आबा इंगोले उपसरपंच प्रदिप कोटुळे पाटिल दै झुंजार नेता चे उपसंपादक अशोक भाऊ सुखवसे विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भागवत मस्के पाटील जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गिराम पाटील जिल्हा उपाध्यक्ष प्रमेश्वर बप्पा कवचट जिल्हा उपाध्यक्ष रवि आण्णा डोंगरे काळे पाटिल व मित्र परीवार व पदाधिकारी उपस्थित होते.

## माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेस सदिच्छा भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी नुकतीच अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या हस्ते धिरज देशमुख यांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी,कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके , बीड जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष कचरूलाल सारडा, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,



सुनील वाघाळकर, गणेश मसने, ॲड अनिल लोमटे हे उपस्थित होते.

या सदिच्छा भेटी दरम्यान धिरज देशमुख तथा राजकिशोर मोदी यांच्यामध्ये बँकिंग क्षेत्रातील विविध विषयावर सखोल चर्चा झाली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तथा अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या विविध योजनाबाबत देखील चर्चा झाली. ५५० कोटीच्या ठेवी तसेच १९ कोटी गुंतवणूकीच्या माध्यमातून आज अंबाजोगाई पिपल्स बँक महाराष्ट्र भर ग्राहकांना सेवा पुरवत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या कार्यरत वीस शाखाबद्दल सविस्तर माहिती देतांनाच भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकत्याच निलंगा, मुरुड, केज या नवीन तीन शाखांना परवानगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमीत्त रक्तदान शिबीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर च्या वतीने श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. १९ मार्च बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले आहे. दि. १९ मार्च ते ३० मार्च दरम्यान सध्या मुळव्याध, भगंदर, नासर, बालरोग, सर्व महिला रोग, मासिक पाळी चे आजार, वंध्यत्व, पोटाचे विकार, वृध्दपकाळातील आजार, मधुमेह, पंचकर्म यासह विविध प्रकारच्या आजारांचे मोफत तपासणी शिबिर चालू आहे या शिबीराचा माजलगाव शहरासह

▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात'मध्ये औषधांचा तुटवडा!
# खाजगी मेडिकल वाल्यांनी रुग्णांची लूट करु नये : शेखर भुंबे

**गेवराई । प्रतिनिधी**

गोरगरिबांचा आधार असलेल्या गेवराई उपजिल्हा रुग्णालयात (सिव्हिल) औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. रुग्णांच्या जखमेवर ड्रेसिंग करायचे साहित्य नाही. मधुमेह, रक्तदाबावरील गोळ्यांचा नेहमीच खडखडाट असतो. रुग्णांच्या नातेवाईकांना सर्रासपणे बाहेरून औषधे खरेदीसाठी चिठ्ठी दिली जात आहे. खाजगी मेडिकल






वाल्याकडून रुग्णांची मोठ्या प्रमाणात लुट होत आहे त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे सध्या हाल सुरू आहेत.

येथील रुग्णालयात अत्यंत अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली जात नाही यासाठी कोट्यवधी रुपयांची निधी शासनाने मंजूर केला. रुग्णालयाची टोलेजंग इमारत उभा राहिली. मात्र शासनाने औषध खरेदीसाठी निधीच वाढवून दिलेला नाही. गेल्या कित्येक वर्षापासून औषध खरेदीसाठी वर्षाला अल्पावधीत रुपयांचा निधी दिला जात आहे. दररोज रुग्ण बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी दाखल होतात. रुग्णांना वार्डात दाखल करून उपचार केले जातात. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे प्रशासनाला सातत्याने औषध टंचाईचा सामना करावा लागत आहे. शासनाने रुग्णालयात औषध दुकान सुरू केले. मात्र गोरगरीब रुग्णांना औषधे मिळावीत, यासाठी निधी वाढवून देण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाही खासगी रुग्णालात जाऊन उपचार करण्यासाठी ऐपत नसल्याने रुग्ण 'सिव्हिल'मध्ये दाखल होतात. महागड्या तपासण्या करण्याची सामुग्री नाही. सीटीस्कॅन आणि एमआरआय तपासणीला एकतर मिरजेला नाही तर खासगी रुग्णालयात रुग्णांना जावावे लागत

▶▶ उर्वरित पान २ वर

